# बसवंत गार्डन कट्टा




बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र तसेच बसवंत गार्डन हे दोन्ही प्रकल्प केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे; तर साऱ्या देशभरातील नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. येथे दिले जाणारे मधमाशी पालनाचे शास्त्रीय प्रशिक्षण कृषी उत्पादन वाढ आणि मधमाशीजन्य पदार्थांच्या माध्यमातून होणारी रोजगार निर्मिती या दोन्ही बाबतीत पूरक ठरत आहे.

बसवंत गार्डन, आदर्श ग्राम संस्कृतीचे मॉडेल असलेले सेवरगांव या संकुलांमधील फळप्रक्रिया उद्योग, उपाहारगृह, सोविनीअर शॉपी, स्पोर्ट्स झोन, छोट्या मुलांसाठी खेळांच्या सुविधा असणारी स्वतंत्र जागा, पेंटिंग झोन अशी असंख्य आकर्षणे पर्यटकांना आकर्षित करतात. या परिसरात मधमाशी पालन व्यवसायाच्या संदर्भात परिसंवाद आयोजित केले जातात. मान्यवरांच्या सदिच्छा भेटी, अनेक शाळा व महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या सहलीही आयोजित करतात. या साऱ्या उपक्रमांची थोडक्यात माहिती प्रस्तुत सदरातून दर महिन्यात घेऊ...




खादी आणि ग्रामोद्योग विकास मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अंशु सिन्हा (आय.ए.एस.) यांनी अलिकडेच बसवंत मधमाशी उद्यानाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे स्वागत करताना 'पूर्वा केमटेक' व 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार. समवेत 'बसवंत गार्डन'चे प्रकल्प संचालक श्री. संदीप वाघ.